## मिंग्मा शेर्पा यांनी गिरिमित्र संमेलनात सांगितले अनुभव; अविनाश जोशी यांना 'गिरिमित्र जीवनगौरव पुरस्कार'

# बघ! करून दाखवले...

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

'गिर्यारोहण ही अशी नशा आहे जी एखाद्या गिर्यारोहकाच्या अंगात भिनली की ती आजन्म उतरत नाही. माझी बायको अनेकदा म्हणायची, 'हे सर्व सोडून द्या तुम्हाला काही झाले तर आमचे काय होईल?' अशावेळी मरण यायचे असेल तर ते कुठेही येईल त्यासाठी गिर्यारोहण सोडायचे नाही, या मताशी मी ठाम होतो. त्यामुळे मला शिखरांवर जाऊ दे मी नक्कीच काहीतरी वेगळे करून दाखवेन, असे तिला म्हटले होते. आज परदेशातील अनेक संस्था हिमालयीन मोहिमांसाठी मला पाचारण करतात. अनेकदा त्या देशात जाण्याचा योगही येतो. आता मी तिला म्हणतो, बघ! करून दाखवले...' गिर्यारोहणाची नशा कशी कामी आली याचा अनुभव जगातील सर्व अष्टहजारी शिखरे सर केलेल्या मिंग्मा शेर्पा यांनी गिरिमित्र संमेलनात सांगत होते...

महाराष्ट्र सेवा संघ आयोजित '१७वे गिरिमित्र संमेलन' रविवारी मुलुंड येथे उत्साहात पार पडले. 'सर्वप्रथम सर्व माऊंटेनीअर्सना नमस्कार..!' मिंग्मा शेर्पा यांच्या तोंडून निघालेल्या मराठी शब्दांनी संमेलनाच्या दुसऱ्या व अंतिम दिवसाची सुरवात झाली. याप्रसंगी विश्वविक्रमी २२ वेळा एव्हरेस्ट सर करणारे कामी रिता शेर्पा, सर्व अष्टहजारी शिखरे सर करणारे मिंग्मा शेर्पा, प्रसिद्ध गिर्यारोहक - साहसवीर खू स्वी चाहू यांसारखी दिग्गज मंडळी उपस्थित होती. हिमालयातील भारावलेले अनुभव ऐकण्याची संधी सह्याद्रीत वाढलेल्या तमाम दुर्गप्रेमींना संमेलनाच्या निमित्ताने मिळाली. यावेळी गिर्यारोहण करताना होणाऱ्या अपघातांवर भाष्य करताना, 'अनेकदा अपघात झाले की सरसकट त्या ठिकाणांवर बंदी टाकली जाते. परंतु ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, इतक्या वर्षात झालेल्या अपघातांमध्ये गिर्यारोहक दिसणार नाहीत. तर त्यांमध्ये हौसे नवशांची संख्या अधिक आहे. त्यामुळे बंदी हा उपाय नाही, याचा सरकारने विचार करायला हवा. अनेक संस्थांचा पैसे कमावणे हा हेतू असतो परंतु पैसे कमवताना या क्षेत्रातील नैतिकता जपायला हवी. या प्रश्नासाठी आपण सर्व दुर्गप्रेमींनी एकत्र येऊन शासनापर्यंत आवाज पोहोचवायला हवा,' असे मत जेष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांनी व्यक्त केले.

प्रसिद्ध गिर्यारोहक व साहसवीर खू स्वी चाहू यांनी आपला प्रवास 'एखादे यश साजरे करताना किंवा अपयशाचा विचार करताना तो पाच मिनिटांहून अधिक काळ करू नका. ते विचार मागे सोडून तुमच्या पुढच्या प्रवासाला लागा.' अशा सूचक शब्दांत उपस्थितांसमोर उलगडला. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात विंग कमांडर देविदत्ता पांडा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विविध संस्थांनी आपले रेस्क्यूचे काम अविरतपणे चालू ठेवावे असे आवाहन केले. यादरम्यान नाशिकमध्ये गिर्यारोहणाचे बीज रोवणाऱ्या जेष्ठ गिर्यारोहक अविनाश जोशी यांचा 'गिरि मित्र जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. त्यासोबत संमेलनातील विविध सन्मान पुरस्कारांचे वितरण व तद्नंतर विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. दृकश्राव्य स्पर्धेतील विजेती ध्वनिचित्रफित दाखवून संमेलनाची सांगता करण्यात झाली.

प्रथमेश राणे




### आधी संमेलन, मग अमेरिकेला..

वयाच्या विसाव्या वर्षी पोर्टर म्हणून सुरुवात ते वयाच्या चाळीसाव्या वर्षी विश्वविक्रमी २२वेळा सर्वाधिक उंचीच्या एव्हरेस्टचा माथा गाठणाऱ्या कामी रिता शेर्पा यांना अमेरिकेतून एका मोहिमेसाठी पाचारण करण्यात आले होते. परंतु, ती मोहीम पुढे ढकलत त्यांनी गिरि मित्र संमेलनाला प्रथम प्राधान्य देत मुंबई गाठली. यावेळी गिर्यारोहण क्षेत्राबद्दल आपले मत मांडताना, 'शेर्पा म्हणून काम करणं हे अतिशय धोकादायक क्षेत्र आहे. त्यामुळे माझ्या मुलाला या क्षेत्रात न पाठवता त्याला शिकून वेगळे क्षेत्र करिअर म्हणून निवडावे असे सांगितले आहे.' असे त्यांनी सांगितले